# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** अंबाझरी धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या धरणाच्या सांडव्यावर
**{सार्व.आरो.अभि.विभाग}** दरवाजे बसविण्याचे कामाकरीता सल्लागार मार्फत संकल्पन व रेखाचित्र तयार करण्याचे कामाचे व आवश्यक सर्वेक्षण करण्याचे रु. 25,30,498/- चे अंदाजपत्रक (1% Insurance रु. 18,124/- , 1%W.C. रु. 18,124/-, 3% Contingency रु. 54,372/-, Vetting Charges रु. 1,20,000/-, 18% GST रु. 3,26,233/- व 10% Supervision charges रु. 1,81,240/- अंर्तभुत आहे.) पाटबंधारे विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहे. तसेच या कामास पाटबंधारे विभागामार्फत तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या कामास नागपूर इन्व्हॉरमेटल सर्व्हीसेस लि. नागपूर यांना देण्यात येणारे अर्थसंकल्पीय अनुदानाअंतर्गत पद क्र. A43801940701 मधुन प्रावधान देण्यात आलेले आहे. सदर काम नागपूर पाटबंधारे विभागामार्फत ठेव तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे.

करीता उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

1) सदर काम पद क्र. A43801940701(नागपूर इन्व्हॉरमेटल सर्व्हीसेस लि. नागपूर यांना देण्यात येणारे अर्थसंकल्पीय अनुदान) अंर्तगत प्रस्तावित आहे.
2) सदर काम ठेव तत्वावर नागपूर पाटबंधारे विभागाकडून करण्यात येईल.
3) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 720/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 22/01/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार अंबाझरी धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या धरणाच्या सांडव्यावर दरवाजे बसविण्याचे कामाकरीता सल्लागार मार्फत संकल्पन व रेखाचित्र तयार करण्याचे कामाचे व आवश्यक सर्वेक्षण करण्याचे रु. 25,30,498/- चे अंदाजपत्रक (1% Insurance रु. 18,124/- , 1%W.C. रु. 18,124/-, 3% Contingency रु. 54,372/-, Vetting Charges रु. 1,20,000/-, 18% GST रु. 3,26,233/- व 10% Supervision charges रु. 1,81,240/- अंर्तभुत आहे.) पाटबंधारे विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहे. तसेच या कामास पाटबंधारे विभागामार्फत तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या कामास नागपूर इन्व्हॉरमेटल सर्व्हीसेस लि. नागपूर यांना देण्यात येणारे अर्थसंकल्पीय अनुदानाअंतर्गत पद क्र. A43801940701 मधुन प्रावधान देण्यात आलेले आहे. सदर काम नागपूर पाटबंधारे विभागामार्फत ठेव तत्वावर करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.